**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उझबेकिस्तानच्या दौऱ्यावर ताश्कंदमध्ये दाखल

- आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या सरकारनं मान्य केल्याची आदिवासी विकास मंत्र्यांची माहिती

- मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे आजपासून अंतरवली सराटीमध्ये पुन्हा बेमुदत उपोषणावर

**आणि**

- FSSAI कडून एव्हरेस्ट आणि एलजीच्या कंपाऊंड हिंगावर बंदी

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज उझबेकिस्तानची राजधानी ताश्कंद इथं पोहोचले. उझबेकिस्तानचे राष्ट्रपती शौकत मिर्जियायोव यांनी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं. अलिकडे भारत आणि उझबेकिस्तान दरम्यान धोरणात्मक भागीदारीमध्ये उल्लेखनीय प्रगती झाली असून व्यापार, गुंतवणूक, डिजिटल संपर्कव्यवस्था, संरक्षण आणि ऊर्जा या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यासाठी या भेटीत चर्चा करणार असल्याचं मोदी यांनी सांगितलं. या दौऱ्यात ते शास्त्री स्मारक आणि महात्मा गांधी केंद्रालाही भेट देणार आहेत.

त्यानंतर ते किर्गिझ प्रजासत्ताकच्या चार दिवसांच्या दौऱ्यासाठी रवाना होणार आहेत. किर्गिझ प्रजासत्ताकच्या दौऱ्यात प्रधानमंत्री मोदी, शांघाय सहकार्य संघटनेच्या २६व्या शिखर परिषदेत सहभागी होणार असून किर्गिझ प्रजासत्ताकाचे अध्यक्ष सदिर झापारोव्ह यांच्यासह इतर नेत्यांशी महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर चर्चा करणार आहेत. या दोन्ही देशांच्या भेटीमुळे मध्य आशियामधली भारताची धोरणात्मक भागीदारी आणि या प्रदेशाबरोबरचे सांस्कृतिक बंध दृढ होतील, असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी रवाना होण्यापूर्वी जारी केलेल्या निवेदनात व्यक्त केला.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३७वा भाग

असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या विविध वाहिन्या, न्यूज ऑन एआयआर वेबसाइट आणि मोबाइल ॲपवर प्रसारित केला जाईल. याशिवाय एआयआर न्यूज, डीडी न्यूज, प्रधानमंत्री कार्यालय तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनेलवरही या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण केलं जाईल.

<><><><><>

नेपाळमधे अडकलेल्या राज्यातल्या ४०४ पर्यटकांपैकी ३३८ जणांशी संपर्क झाला असून त्यातले ३७ जण मायदेशी परत यायला निघाले आहेत. मुंबईच्या एका पर्यटन संस्थेमार्फत गेलेल्या ६० पर्यटकांचा अद्याप पत्ता लागला नसल्याचं राज्य शासनाच्या पत्रकात म्हटलं आहे. राज्याच्या विविध भागातून गेलेले १४९ पर्यटक चीन किंवा तिबेटमधे सुरक्षित असल्याचं परराष्ट्रव्यवहार मंत्रालयानं कळवलं असून त्यांची यादी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पाठवली आहे.

राज्यातल्या १०० भाविकांची बिहार राज्यसरकारच्या मदतीने सुखरूप सुटका करण्यात आली. नेपाळ हद्दीवरुन काल त्यांना सुरक्षाव्यवस्थेसह बिहारमधे आणलं. त्यांच्या भोजन आणि निवासाची व्यवस्था करुन त्यांना आज सकाळी साडेसातवाजता रेल्वेगाडीने महाराष्ट्राकडे रवाना करण्यात आलं.

नेपाळमध्ये अचानक आलेल्या पुरामुळे मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या ६६९वर गेली आहे, जवळपास अडीच हजार लोक अद्याप बेपत्ता आहेत. या महापुराचा फटका बसलेल्या ८ जिल्ह्यांमध्ये मदत आणि बचावकार्य सुरू असून मृतदेह हाती लागत आहेत. नेपाळच्या सुरक्षा दलांचे ११ हजारापेक्षा जास्त कर्मचारी मदत आणि बचावकार्यात गुंतले आहेत.

<><><><><>

राज्यात ३ ठिकाणी उपोषण करणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या सरकारनं मान्य केल्याची घोषणा राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी आज केली. यासंदर्भात आज मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक झाली. आदिवासी समुदायातल्या विद्यार्थ्यांना सरकारी नोकऱ्या देणं आणि आदिवासी आश्रमशाळांची परिस्थिती सुधारणं इत्यादी मागण्या सरकारनं मान्य केल्या. यानंतर आज हे विद्यार्थी उपोषण मागे घेण्याची शक्यता आहे. गडचिरोली जिल्ह्यातल्या आदिवासी आश्रमशाळेत ३ विद्यार्थिनींचा

सर्पदंशामुळे मृत्यू झाल्यानंतर पुणे, नागपूर आणि नाशिक या तीन ठिकाणी विद्यार्थ्यांनी उपोषण सुरू केलं होतं.

<><><><><>

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी जालना जिल्ह्यातल्या अंतरवाली सराटी इथं विविध मागण्यांसाठी आजपासून पुन्हा बेमुदत उपोषण सुरू केलं. माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीला आढळलेल्या कुणबी नोंदींनुसार जात प्रमाणपत्रं द्यावी, रद्द केलेली प्रमाणपत्रं पुन्हा वितरित करावीत, हैदराबाद, सातारा, कोल्हापूर गॅझेटियरनुसार कुणबी प्रमाणपत्रांचं वाटप करावं या त्यांच्या प्रमुख मागण्या आहेत. मराठा आरक्षणाच्या आंदोलनात बलिदान दिलेल्यांच्या कुटुंबातल्या सदस्यांना शासकीय नोकरी द्यावी, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे परतावे द्यावेत, सारथीच्या योजना प्रभावीपणे सुरू कराव्यात आदी मागण्याही जरांगे यांनी यावेळी केल्या. उपोषणस्थळी मराठा समाजबांधवांची मोठी गर्दी असून, पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. अंतरवाली सराटी इथं मागण्या मान्य झाल्या नाही तर मुंबईत आंदोलन करायचा इशारा जरांगे यांनी दिला आहे.

दरम्यान, या आंदोलनाच्या समर्थनार्थ सांगलीत मराठा समाजानं जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ पोलखोल आंदोलन सुरू केलं आहे.

तर ओबीसींच्या आरक्षणाच्या संरक्षणाच्या लढाईसाठी ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी १ सप्टेंबर रोजी मुंबईच्या दिशेने मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. नवी मुंबईत वाशी इथं आयोजित एका पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पुणे जिल्ह्यातल्या दौंड तालुक्यातल्या पाटस टोलनाक्यावरून मुंबईच्या दिशेने ही संघर्ष यात्रा सुरू होणार आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

अतिरिक्त संतृप्त मेद, अतिरिक्त साखर तसंच मिठाचं प्रमाण जास्त आहे, अशा खादोत्पादनांच्या पाकिटाच्या दर्शनी भागावर लाल रंगात ठळक स्वरुपात इशारा लावण्याचा प्रस्ताव आपण मांडला असल्याचं FSSAI अर्थात भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणानं म्हटलं आहे. यासंदर्भात प्राधिकरणानं सर्वोच्च न्यायालयात अनुपालनविषयक प्रतिज्ञापत्र दाखल केलं आहे. अशा पोषक घटकांचं जास्त प्रमाण असलेल्या खाद्योत्पादनांबद्दल ग्राहकांना सोप्या, ठळक आणि सहज समजू शकेल अशा भाषेत इशारा देता येणं हा या प्रस्तावाचा मुख्य उद्देश असल्याचं प्राधिकरणानं आपल्या प्रतिज्ञापत्रात म्हटलं

आहे. याअंतर्गत ग्राहकांना अशी खाद्योत्पादनं सहज ओळखता यावीत यासाठी गरजेनुसार हाय फॅट, हाय शुगर, हाय सॉल्ट, किंवा हायली स्वीटन्ड बेव्हरेज असे ठळक शब्दांमध्ये दिसणारे इशारे या लेबलवर असतील असंही प्राधिकरणाने म्हटलं आहे.

यासंदर्भात एका सामाजिक संस्थेनं सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवरच्या सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयानं १३ ऑगस्ट रोजी दिलेल्या आदेशानुसार प्राधिकरणानं हे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

<><><><><>

FSSAI नं एव्हरेस्ट आणि एल जी या कंपन्यांच्या कंपाऊंडेड हिंगावर बंदी लादली आहे. यासंदर्भात मिळालेल्या एका तक्रारीनंतर प्राधिकरणानं सर्व प्रमुख कंपन्यांच्या हिंग उत्पादनांची प्रयोगशाळेत चाचणी केली. त्यात या दोन्ही कंपन्यांची हिंग निकृष्ट दर्जाची आढळून आल्याचं FSSAI नं म्हटलं आहे. या कंपन्यांच्या हिंगामध्ये कच्च्या हिंगाचं प्रमाण निर्धारित प्रमाणापेक्षा ३० ते ४० टक्के कमी होतं. तसंच इतर पदार्थ मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात होते. विविध वेळा उत्पादित केलेल्या हिंगांमध्ये या त्रुटी आढळून आल्या. महाराष्ट्र आणि गुजरातमधल्या हिंगाच्या नमुन्यांची तपासणी केल्यावर प्राधिकरणानं हा निर्णय घेतला. दुकानांमध्ये विक्री साठी ठेवलेली  निकृष्ट दर्जाची उत्पादनं बाजारातून स्वतःहून परत घ्यावीत असा सल्ला देखील प्राधिकरणानं या कंपन्यांना दिला आहे.

<><><><><>

मुंबईतल्या एमसीए क्लबच्या क्रिकेट संघटनेच्या परिसरातल्या ५ उपहारगृहांचे परवाने रद्द करणारा आदेश मागे घेऊ, असं अन्न आणि औषध प्रशासन एफडीएनं आज मुंबई उच्च न्यायालयाला सांगितलं. एफडीएचे अधिकारी व्यावहारिक पद्धतीनं काम न करता अनावश्यक बारकाव्यांवर भर देत आहेत, असं मत प्रभारी मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या पीठानं नोंदवलं आणि अधिकाऱ्यांविरोधात कठोर आदेश द्यायचा इशारा दिला. त्यानंतर एफडीएनं ही भूमिका घेतली. ही ५ उपहारगृहं पुन्हा सुरू करायला न्यायालयानं परवानगी दिली.

सिप्ला कंपनीच्या पुण्यातल्या उत्पादन केंद्राचा औषध विक्री परवाना रद्द करणारा आदेशही एफडीएनं आज मागे घेतला. एफडीएनं मर्यादा ओलांडल्याचे आणि मनमानी पद्धतीनं कारभार केल्याचे ताशेरे प्रभारी मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम

अंखड यांच्या पीठानं ओढले. सिप्लाच्या या उत्पादन केंद्रात रिॲक्टिन प्लस या गोळ्यांचं पॅकेजिंग, साठवण आणि या गोळ्या परत मागवण्याच्या प्रक्रियेत गंभीर त्रुटी आढळल्यानं काल एफडीएनं ही कारवाई केली होती.

<><><><><>

आपल्या मागण्यांसाठी उपोषणाला बसलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांची सर्वतोपरी काळजी घ्यावी असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयानं राज्य सरकारला दिले आहेत. गडचिरोली जिल्ह्यातल्या आश्रमशाळेत काही दिवसांपूर्वी  सर्पदंशामुळे तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाला होता, त्याअनुषंगानं विद्यार्थ्यांनी आश्रम शाळांमधल्या सद्यस्थितीसंदर्भात दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणीदरम्यान  प्रभारी मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या पीठानं आज हे निर्देश दिले.

//<><><><><>//